स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक आचारसंहिता कालावधीमध्ये राजकीय पक्ष, उमेदवार यांच्या, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांद्वारे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) प्रसारित करण्यात येणाऱ्या मुलाखती इ. बाबत..

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक:- स्थास्वसं-११०३/प्र.क्र.३२/का.०५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १७ मार्च, २००५

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी समक्रमांकाने दि. १० मार्च, २००५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचे आचारसंहितेचे कालावधीमध्ये इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) याद्वारे राजकीय स्वरूपाच्या मुलाखती किंवा अशा इतर कार्यक्रमांचे प्रसारण करण्याबाबत काढलेले आदेश रद्द करण्यात येत असून आचारसंहितेच्या कालावधीमध्ये इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे (केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी) यांना राजकीय स्वरूपाच्या मुलाखती किंवा अशा इतर कार्यक्रमांचे प्रसारणासाठी पूर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र अशा प्रसारणाशी जबाबदार असणाऱ्या केबल नेटवर्क किंवा स्थानिक वाहिनी तसेच सहभागी होणाऱ्या राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. तसेच या प्रसार माध्यमांतून जाहिरात प्रसिध्द केल्यास त्याचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करण्यात यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार.

( महेन्द्र ब. वारभुवन )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
(१) सर्व विभागीय आयुक्त
(२) सर्व महानगर पालिका आयुक्त
(३) सर्व जिल्हाधिकारी
(४) सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगर पंचायती
(५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
(६) निवड नस्ती

C:\My Documents\MAHALE\code of conduct.doc/est